## महाविद्यालयाविषयी :-

मराठवाड्यातील शैक्षणिक मागसलेपण दूर करण्यासाठी 1958 मध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करण्यात आली. र.भ. अट्टल महाविद्यालय हे दर्जेदार शिक्षण देणा-या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय आहे. मराठवाडयातील आणि विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे व त्यांच्या पर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचावी या उद्देशाने 1971 ला गेवराई येथे र. भ. अट्टल महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थी केंद्रबिंदू मानुन महाविद्यालयात अध्ययन व अध्यापनासोबत विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयात समृध्द ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, व्यवसाय मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा केंद्र, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, भव्य क्रीडांगण, व्यायाम शाळा, सुसज्ज वस्तीगृह व निसर्गरम्य परिसर आहे. हे महाविद्यालय ISO 9001:2008 मानांकन प्राप्त आहे. तसेच नॅक तृतीय मुल्यांकनात महाविद्यालयास "ब " दर्जा (2.78 CGPA) प्राप्त आहे.

गेवराई शहर आणि परिसराची सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थीक जडणघडण करण्यामध्ये महाविद्यालयाचा महत्वाचा वाटा आहे.

## चर्चासत्रा विषयी:-

भारतीय संस्कृतीमध्ये विश्वाला कुटुंबाची उपमा दिलेली आहे, जसे **'वसुधैव कुटुंबकम '** प्राचीन भारतीय संस्कृती अध्यात्म व त्यागावर आधारीत होती व तिचा उद्देश विश्व कल्याण हा होता. भारताने 1991मध्ये मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले व त्यातून नवसाम्राज्यवाद अस्तित्वात आला. त्यामुळे जागतीकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या संकल्पना अस्तित्वात आल्या. या संकल्पनातून विश्व जवळ येवू लागले, परंतु मानव मानवापासून दूर होत चालला. जागतिकीकरणाच्या संस्कृतीतून अर्थकेंद्रित उपभोगतावाद वाढला व प्रत्येक गोष्ट आर्थिक फायदयाच्या दृष्टिकोनातून बघण्यास सुरवात झाली. जागतिकीकरणाचा भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मीक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यीक व कृषी जीवनावर प्रतीकूल दिर्घ परिणाम झाल्याचे दिसून आले. डॉ. प्रभाकर क्षोत्रिय या संदर्भात असे म्हणतात की, "सभ्यताएँ विचलित हैं, संस्कृतियाँ अपनी मौलीक विशेषताएँ खो रही है, भाषा अलग विलोड़न से मटमैली हो रही है। समाज, राजनीति और प्रकृति सब एक तरह के विपर्यय और ध्वंस से गुजर रहे है।" जागतिकीकरणाच्या परिणामांचा अभ्यास करण्याच्या उद्देशातून 'जागतिकीकरण: साहित्य व समाज' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात येत आहे.

## चर्चासत्राचा उद्देश:-

- जागतिकीकरणाची मूळ संकल्पना व तिची व्याप्ती समजून घेणे.
- जागतिकीरणाचा सामाजिक व साहित्यीक जीवनावर झालेल्या अनुकूल व प्रतिकूल परिणामाचा आढावा घेणे.
- जागतिकीकरणाच्या यश-अपयशाची चर्चा घडवून आणणे.
- जागतिकीरणाला पर्याय उपलब्ध आहेत काय? यावर चर्चेच्या माध्यमातून उत्तर शोधणे.
- भारतातील बदलती सार्वजनिक धोरणप्रक्रिया आणि योजना निर्मीतीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव समजून घेणे.

## उपविषय:-

1. जागतिकीकरण आणि बाजारवाद
2. जागतिकीकरण आणि भाषा
3. जागतिकीकरण आणि साहित्य
4. जागतिकीकरण आणि समाज
5. जागतिकीकरण आणि संस्कृती
6. जागतिकीकरण आणि मीडिया
7. जागतिकीकरण आणि पर्यावरण
8. जागतिकीकरण आणि नागरीकरण
9. जागतिकीकरण आणि आर्थीक सुधारणा व विकास
10. जागतिकीकरण आणि नागरी केंद्रित प्रशासन
11. जागतिकीकरण आणि सार्वजनिक धोरण
12. जागतिकीकरण आणि क्रीडा
13. जागतिकीकरण आणि दहशतवाद, सायबर गुन्हेगारी
14. जागतिकीकरण आणि कृषिव्यवस्था
15. जागतिकीकरण आणि मानवीय मूल्य
16. जागतिकीकरण आणि शिक्षण
17. जागतिकीकरण आणि अनुवाद
18. जागतिकीकरण आणि तुलनात्मक संशोधन
19. जागतिकीकरण आणि मानवी वर्तन
20. जागतिकीकरण आणि उपेक्षित घटक (महिला, आदिवासी, दलित, अल्पसंख्यांक, शेतकरी, वृध्द, किन्नर इ. घटक / विमर्श)

**या विषयाशी संबंधीत अन्य विषयांवर आपण आपले शोधनिबंध पाठवू शकतात.**

## शोधनिबंध:-

सदरील चर्चासत्रासाठी आपण आपले स्वत:चे अप्रकाशित शोधनिबंध आपण पाठवू शकता. पूर्ण पेपर 2000 शब्दापेक्षा मोठा नसावा. आपण आपले शोधनिबंध Pagemaker / Microsoft Word मध्ये इंग्रजी Times New Roman Font 12 व मराठी, हिंदी साठी DVB-TT-Yogesh, DVB-TT-Surekh, Krutidev10, APS Font 14 मध्ये पाठवावेत. पेपरच्या सुरवातीला आपले नाव, कॉलेज, मेल व मोबाईल नंबरचा उल्लेख अवश्य करावा. आपण पाठविलेले शोधनिबंध UGC Approved International Research Refereed/ Indexed व Impact Factor 2.14 असलेल्या Journal मध्ये प्रकाशित केले जातील. कृपया पेपर पाठवताना त्यासोबत आपण भरलेल्या नोंदणी शुल्काची पावती स्कॅन करुन मेल करावी.

## नोंदणी शुल्क:

| अ.क्र. | तपशिल | फिस |
|---|---|---|
| 1 | प्राध्यापकांसाठी | 800/- |
| 2 | संशोधक विद्यार्थी | 500/- |

आपले नोंदणी शुल्क, प्राचार्य, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई यांच्या नावाने Bhavani Urban Bank,Branch Georai या शाखेच्या खाते क्रमांकावर ऑनलाईन / NEFT व्दारे पैसे पाठवू शकता.

**A/c Name - Principal, R.B. Attal Art's, Science & Commerce College, Georai**

**A/c No. - 001002100000309**

**IFSC Code - ICIC00BHAUC**

**टिप:** 1. नोंदणी शुल्क भरल्याशिवाय शोधनिबंध प्रकाशित केला जाणार नाही.

2. शोधनिबंध पाठविण्याची अंतिम तारीख 31 जानेवारी, 2018 राहील.

3. आपले शोधनिबंध पूढील मेलवर पाठवावेत.


1. Nagaresantosh1@gmail.com मो.नं. 9421651321
2. rbkale1@rediffmail.com मो.नं. 9405468602
3. helambe.hanmant@gmail.com - मो.नं. 9767530261